# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

February 2020 Special Issue-22 Vol. 4

# The Role of Women in Global Development

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

१८. स्तंभ लेखन 52
प्रा.डॉ. गायकवाड वाय.जे.

19. जलसंधारण एक भौगोलीक अभ्यास 55
प्रा.डॉ.घोडके जे.व्ही.

२०. महिला सक्षमीकरण : संवैधानिक तरतूदींचा राजकीय अभ्यास 57
प्रा.डॉ.हरिभाऊ पांडुरंग कदम

21. भारतीय राजकारणात अल्पसंख्यांकांचा सहभाग 59
डॉ.जोगदंड संजय पांडुरंग

२२. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान 61
प्रोफेसर–किशोरकुमार गव्हाणे

२३. जलसंधारण मानवी अस्तित्वासाठी अत्यावश्यक 64
डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव

२४. मानवी विकासाचे महत्त्व 66
डॉ. प्रकाश बाबुराव तितरे

२५. आंतरराष्ट्रीय राजकारणात विश्व न्यायाची भूमिका 70
डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके

२६. **भारतीय सिनेमातील स्त्री चित्रण** 72
**डॉ. राजेंद्र गोणारकर**

२७. वृद्धाश्रमातील वृद्ध महिलांची सामाजिक स्थिती 74
प्रा. डॉ. सरोज आगलावे

२८. प्रशासकिय सुधारणामध्ये संघटन व पध्दतीची भुमिका 79
प्रा.सौ.डॉ.सयद कुरेशाबी नजीरसाब

२९. "भारतीय महिलांचा सामाजिक दर्जा आणि समस्याचे अध्ययन" 82
प्रा.डॉ.शेकोबा परशुराम ढोले

३०. ग्रंथालय आणि डिजिटल माध्यमे 86
प्रा.डॉ.व्ही.बी. माने

३१. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या व उपाययोजना 89
डॉ. वंदना नामदेव बनकर

३२. शाश्वत पर्यावरण आणि विकास 93
प्रा.डॉ.देशमुख आर.के.

३३. भ्रष्टाचार प्रशासना समोरील एक व्यापक व गंभीर समस्या 96
डॉ.जाधव संजयकुमार हनुमंत

३४. प्रशासकीय सुधारणा-स्वरुप, आव्हाणे आणि उपाय योजना 98
प्रा.डॉ.सुधाकर एस.हांगे

३५. बालकांच्या व्यक्तीमत्त्व विकासात सामाजिकरणाची भूमिका 100
डॉ.विद्या खंडारे – गोवंदे

३६. कृषी आणि आर्थिक विकास 102

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22 , Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान

**प्रोफेसर–किशोरकुमार गव्हाणे**
(इतिहास–विभाग प्रमुख) एस.पी. कॉलेज, भूम.

---

**प्रस्तावना :**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतात स्थिर झाली. त्यामुळे मध्ययुगीन स्थानिक राजवटींचा शेवट होवून एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. हळूहळू कंपनी सरकारच्या साम्राज्यवादी धोरणाचा, त्यांनी चालविलेल्या दडपशाहीचा आणि आर्थिक शोषणाचा प्रत्यय भारतीय जनतेला होवू लागला. त्यामुळे ब्रिटीश सत्तेचे गोडवे गाणारा भारतीय समाज स्वातंत्र्यासाठी झुंज देण्यास प्रवृत्त झाला. यातूनच इ.स. 1885 मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेस (राष्ट्रीय सभा) उदयास आली. उदयास आलेली राष्ट्रीय सभा हे अखिल भारतीय स्वरूपाचे व्यासपीठ होते. सर्व जाती, धर्म, पंथ व विविध प्रांतातील लोकांप्रमाणेच भारतीय महिलांही राष्ट्रीय सभेच्या या व्यासपीठावर एकत्र आल्या. सन 1885 पासून कॉंग्रेसने सुरू केलेल्या सनदशीर राष्ट्रीय चळवळीमध्ये महिलांचाही सहभाग होता. अनेक महिलांनी स्वातंत्र्य लढ्यात आपुली आहुती दिली आहे. भारतीय महिलांप्रमाणेच भारतीय तत्वज्ञानाने भारावलेल्या काही विदेशी महिलांचेही भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वाचे योगदान आहे. या विदेशी महिलांनी भारतात येवून, विविध संघटना स्थापन करून राष्ट्र जागृतीचे कार्य पार पाडले आहे. या विदेशी महिलांमध्ये डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान मोलाचे आहे. थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये प्रवेश करून हिंदुस्थान हेच आपले घर मानून हिंदुस्थानच्या राजकीय व सामाजिक या दोन्ही क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा अद्वितीय ठसा उमटवला आहे.

**जन्म व बालपण :**

एक थोर थिऑसॉफिस्ट म्हणून ओळख असणाऱ्या ॲनी बेझंट यांचा जन्म लंडनमध्ये 1 ऑक्टोबर 1847 मध्ये एमिली आणि विल्यम पेजवुड या दांपत्याच्या पोटी झाला.[1] ॲनी बेझंट च्या आई आयरिश असून वडिलांचा विचार केला तर मातृवंशाकडून तेही आयरिशच होते. इ.स. 1852 मध्ये ॲनी बेझंट यांच्या वडिलांचे निधन झाल्याने त्यांची सर्वस्वी जबाबदारी आई एमिलीवर येवून पडली. बालवयातच ॲनीला जर्मन, फ्रेंच इत्यादी भाषाशिवाय संगिताचेही शिक्षण मिळाले. इ.स. 186 मध्ये रेव्हरंड फ्रॅंक बेझंट यांच्याशी ॲनीचा विवाह करण्यात आला. या दांपत्याला दिग्बी हा मुलगा तर मेबल ही मुलगी अशी दोन अपत्य झाली. हळूहळू ॲनीचा कल नास्तीकपणाकडे झुकल्याने त्या पतीपासून अलग झाल्या. वयाच्या 26 व्या वर्षी ॲग्लिकन रीतिरिवाजाचा त्याग करून जगप्रसिध्द नास्तिक चार्लस ब्रॅडलॉ यांच्या नॅशनल सेक्युलर सोसायटीत सामील झाल्या.[2] चार्लस ब्रॅडलॉ हे एक हिंदुस्थानाबद्दल आस्था बाळगणारे मुक्त विचारवंत व सुधारक होते. ॲनी बेझंट यांना सामाजिक कार्याची आवड असल्याने प्रथम वृत्तव्यवसायात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. इंग्लडमधीलआगपेट्याच्या कारखान्यात काम करणाऱ्या मुलींच्या हक्कासाठी त्यांनी केलेल्या संघर्षामुळे त्यांचे नाव प्रसिध्दीस आले.

**थिऑसॉफिकल सोसायटीत प्रवेश–**

थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना रशियन विदुषी मादाम ब्लाव्हाटस्की व अमेरिकन लष्करी अधिकारी कर्नल हेन्री स्टील आलकॉट यांनी इ.स.1875 मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात केली.[3] थिऑसॉफी या शब्दाचा अर्थ ईश्वरीय ज्ञान होय. ही चळवळ विकसित झाल्यावर तिने इजिप्शियन, हिंदू व बौध्द धर्मातील कल्पना आणि संज्ञाचा वापर केला. स्वामी दयानंद सरस्वतीच्या विनंतीमुळे कर्नल हेन्री आलकॉट इ.स. 1879 मध्ये भारतात आले. प्राचीन हिंदू धर्म तत्वज्ञान सर्व धर्मात कसे श्रेष्ठ आहे याचा प्रचार त्यांनी भारतात केला आणि सन 1882 मध्ये भारतातील मद्रास प्रांतातील अड्यार या ठिकाणी त्यांनी थिऑसाफफिकल सोसायटींची स्थापना केली. Pllamall Gazatte & Review of Reviews नियतकालीकाच्या संपादकाशी ॲनी बेझंट यांचा परिचय झाला. यातूनच पुढे त्यांचा मादाम ब्लाव्हाटस्की यांच्याशी परिचय होवून त्यांनी स्थापन केलेल्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या त्या सदस्य बनल्या. सन 1892 मध्ये मादाम ब्लाव्हाटस्की यांच्या मृत्युनंतरही त्यांनी सोसायटीचे कामकाज चालू ठेवले. 'मी इंग्लंडमध्ये असले तरी हिंदुस्थान व हिंदी लोक मला माझ्या बांधवापेक्षाही जवळच्या वाटतात' असे त्या म्हणत.[4]

**डॉ. ॲनी बेझंट भारतात** :थिऑसॉफिकल सोसायटीच्या माध्यमातून ॲनी बेझंट हिंदी लोक व हिंदू धर्माशी संपर्क व लागल्याने सन 1893 च्या शिकागो धर्म परिषदेतही त्यांनी भाग घेतला. या धर्मपरिषदेतील स्वामी विवेकानंदाच्या भाषणा त्या प्रभावित होवून हिंदू धर्म व संस्कृतीकडे आकर्षित झाल्या. सन 1893 मध्ये ॲनी बेझंट भारतात आल्या आणि येथे स्थायिक झाल्या. याच वर्षी कर्नल एच.एस.ऑलकॉट यांच्याबरोबर या उपखंडाच्या भागात 6000 मैलांपेक्षा अधिक त्य प्रवास केला. या प्रवासात त्यांनी 120 पेक्षाही अधिक सार्वजनिक भाषणे दिली.[5]ॲनी बेझंट यांना हिंदू संस्कृती, तत्वज्ञान ... ... पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाने दडपल्या गेलेल्या भारतीयांना त्यांच्या बहुमोल सांस्कृ

## क व वाङ्मयीन कार्य :

थिऑसॉफिकल सोसायटीच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या यटीच्या वतीने गुजरातमध्ये मुलींची शाळा स्थापन केली. आंध्रप्रदेशातील मरपल्ले या ठिकाणी 'बेझंट थिऑसाफफिकल जे' व 'बेझंट थिऑसाफफिकल हायस्कूल' ची स्थापना करण्यात आली[6] इतर ठिकाणी स्त्रिया व दलितांसाठी शाळा सुरू ण्यात आल्या. खरीखुरी भारतीय शिक्षण पध्दती प्रस्थापित करण्याचे त्यांचे ध्येय पूर्ण करण्यासाठी सन 1898 मध्ये रसला 'सेंटल हिंदू कॉलजची' स्थापना केली. जॉर्ज अरूंडेलनी लिहिले आहे, 'परकीयांनी जे चोरले ते ॲनी बेझंट ही ीय स्त्री परत मिळवून देते.'[7] ॲनी बेझंट बनारसमध्ये वास्तव्यास आल्यानंतर त्यांनी सनातन धर्म मालिकेतील हिंदू वरील छोट्या पुस्तिकांचे संकलन करण्यात डॉ. भगवान दास, श्री. उपेंद्र बसू आणि गोविंद दास यांना मदत केली. स्वतः नी बेझंट यांनी भगवत गीतेचा अनुवाद केला. धार्मिक सहिष्णुतेवर भर देत असताना जातिभेद व वर्णभेदांना त्यांनी तीव्र ध केला. बालविवाह, पडदा पध्दती, निरक्षरता, मद्यपान इत्यादींना प्रतिबंध करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. सन 1924 ये कलकत्याच्या कमला व्याख्यानमालेतून बोलताना त्यांची शिक्षण विषयक उच्च विचार सरणी व दूरदृष्टी दिसून येते. क्षणासाठी स्वातंत्र्य असले पाहिजे असे त्यांचे मत होते आणि देशाचे शिक्षण ही देणगी नसून गुंतवणूक आहे असेही त्यांना त असे.

## वातंत्र्य चळवळीतील योगदान :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान अविस्मरणीय आहे. एक विदेशी महिला रतीय स्वातंत्र्यासाठी हिरहिरीने झटत आहे हे तत्कालीन इतिहासात अभिमानास्पद आहे. सन 1913 मध्ये ॲनी बेझंट यांनी रतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारल्यानंतर भारतीयांना स्वराज्याचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. पहिल्या गतिक महायुध्दात इंग्लडला भारतीय करत असलेल्या मदतीच्या मोबदल्यामध्ये ब्रिटिश सरकारने भारतीयांना राजकीय धिकार द्यावेत, अशी मागणी डॉ. ॲनी बेझंट यांनी केली होती.[8] हिंदुस्थान व हिंदी लोक मला माझ्या बांधवांपेक्षाही जवळचे वाटतात असे त्या म्हणत असत. 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याप्रश्नी हिंदुस्थानला बक्षिस म्हणून स्वराज्य नको तर, हा आमचा हक्क आहे' असे त्यांनी उद्‌गार काढले आहेत.[9] जुलै 1914 मध्ये त्यांनी 'मद्रास स्टॅन्डर्ड' विकत घेतले व त्या मुद्रक काशक व मालक झाल्या त्याचे नांव त्यांनी 'New India' (न्यू इंडिया) असे ठेवले. या वर्तमानपत्रातून भारतीय संस्कृतीचा महिमा राज्याचा प्रसार करू लागल्या. या वृत्तपत्रातूनच इंग्रज सरकारचा निषेध करत असतानाच भारतीय संस्कृतीचा महिमा गण्यास त्या विसरल्या नाहीत. परदेशी वाचकासाठी त्यांनी जानेवारी 1914 मध्ये 'द कॉमनविल' नावाचे साप्ताहिक सुरु केले ते हे नियतकालिक प्रामुख्याने परदेशी वाचकांसाठी सुरू केले होते. कॉमनविल व न्यू इंडिया मधून डॉ. ॲनी बेझंट यांनी ग्लड सरकार भारतीय जनतेवर करत असलेल्या अन्याय अत्याचाराची वाचा फोडली. भारतीय जनतेच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य डॉ. ॲनी बेझंट यांनी पार पाडले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीला दिशा देण्यासाठी त्यांनी सन 1914 व 1915 च्या कॉंग्रेस अधिवेशनात भारतीयांना शासन मिळवून देण्यासाठी 'होमरूल'चा कार्यक्रम कॉंग्रेसने स्वीकारावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. हिंदुस्थानच्या वातंत्र्य चळवळीतील हा महत्वाचा प्रवाह आहे. होमरूल चळवळीने स्वातंत्र्य चळवळीस गतीशिलता आणली. भारतीय समाजात एक प्रकारेच चैतन्य निर्माण केले. या चळवळीने देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात महत्वाची कामगिरी केलेली आहे. ॲनी बेझंट यांनी होमरूल आंदोलनाच्या पाठींब्यासाठी लोकमान्य टिळकांची भेट घेवून होमरूल आंदोलनाची योजना करच कार्यान्वित करणार असल्याचे सांगितले. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वयंशासनाची निर्मिती भारतात करणे हा या ळवळीचा प्रमुख उद्‌देश होता.[10] लोकमान्य टिळकांनी 28 एप्रिल 1916 रोजी 'होमरूल लीग' ची स्थापना केली व त्याचे कार्यालय पुणे येथे ठेवले. डॉ. ॲनी बेझंट यांनीही सप्टेंबर 1916 मध्ये 'होमरूल लीग' या स्वतंत्र संघटनेची स्थापना केली. कमान्य टिळकांनी 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्र माध्यमाद्वारे होमरूल चळवळीचा मोठ्या प्रमाणात प्रचार केला. दौरे व भाषणे यांद्वारे त्यांनी ही चळवळ सामान्य जनतेपर्यंत नेवून पोहोचविली. लोकमान्य टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांच्या होमरूल वेगवेगळ्या संघटना होत्या, तरी त्यांची उद्दिष्टे व चळवळ मात्र एकच होती. होमरूल चळवळ लोकमान्य टिळकांनी हाराष्ट्र, मध्यप्रदेश या ठिकाणी तर डॉ. बेझंट यांनी हे प्रदेश सोडून देशाच्या इतर भागात चालवावी असे ठरले होते.

डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरूल लीगची स्थापना केल्यानंतर या संघटनेच्या जवळपास 200 शाखा देशभर निघाल्या, जॉर्ज अरूंडेल संघटक सचिव, सी.पी रामास्वामी सर्वसाधारण सचिव व बी.पी वाडिया होमरूल लीग संघटनेचे कोषाध्यक्ष रून स्वतः ॲनी बेझंट होमरूल लीग संघटनेच्या अध्यक्ष होत्या. मुंबई, कोलकाता, कानपूर, अलाहाबाद या प्रमुख शहरांमध्ये र काही खेडेगावात लीगच्या शाखा उघडण्यात आल्या होत्या. डॉ. ॲनी बेझंट यांनी देशभर दौरे काढून लोकांना राज्याच्या चळवळीविषयी जागृत केले. त्यांनी भारतीय जनतेत आत्मविश्वास निर्माण केला व त्यांच्यात त्यागाची भावना जागृत केली. डॉ. ॲनी बेझंट यांनी 100 पेक्षा जास्त ग्रंथ लिहिले व 20000 पेक्षा जास्त व्याख्याने दिली. डॉ. ॲनी बेझंटच्या कार्याविषयी पंडीत नेहरू यांनी 'Discovery of India' (भारताचा शोध) या ग्रंथात "एखाद्या शहरात त्या आल्या या वार्तेने त्या शहरात नवे स्फुरण येई" असे गौरवोद्‌गार काढले आहेत.[11] ब्रिटिशांचे राज्य हे भारताचा उध्दार करण्यासाठी नाही तर भारताला रसातळाला नेण्यासाठी आहे. भारत हे पैसा कमावण्याचे केंद्र आहे आणि त्यामुळे भारताचा उध्दार जर व्हायचा असेल तर भारतीयांनीच पुढे आले पाहिजे. इंग्रजांनी भारतीयांचे उद्योग उध्वस्त केले आहेत. इंग्रजांना भारत देशावर राज्य करण्याचा कुठलाच अधिकार नाही हे ठणकावून सांगण्याचे कार्य डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरूल लीगच्या माध्यमातून केले.



S.P. Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Ta. Bhoom Dist. O'bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22 , Vol. 4 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

डॉ. ॲनी बेझंटच्या वरील कृत्याची इंग्रेज सरकारने दखल घेवून 15 जून 1917 रोजी डॉ. ॲनी बेझंट व त्यांचे दोन सहकारी एरंडोले व बी.पी. वाडिया यांना अटक केली. परंतु या चळवळीचा वाढता पाठिंबा पाहून इंग्रज सरकारने डॉ. ॲनी बेझंटची सुटका केली. हिंदुस्थानप्रमाणेच अमेरिका, इंग्लड या देशातही होमरूल लीगने महत्वपूर्ण कार्य केले. सन 1917 साली कलकत्याला भरलेल्या अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या 32 व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. ॲनी बेझंट निवडून आल्या. ही परदेशी महिला कॉंग्रेसची पहिली महिला अध्यक्ष होती. तो त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा सर्वात मोठा सन्मान होता. आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय स्वातंत्र्याचा जाहिरनामा होता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या सर्वांगाला स्पर्श करणाऱ्या विषयांचा उल्लेख होता.

**समारोप :**

जन्माने ब्रिटिश असूनही भारतीय स्वातंत्र्याविषयी अत्यंत तळमळीने काम करणाऱ्या डॉ. ॲनी बेझंट अतिशय विद्वान व विलक्षण स्मरणशक्ती असलेली एक स्त्री होती. ख्रिश्चन धर्माचा स्वीकार न करण्याबरोबरच अयशस्वी विवाह या घटनांनी त्यांना आयुष्याला संघर्षाने तोंड द्यावे लागले. अन्यायाला प्रतिकार करण्याच्या सेवेला त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते. शिकागो येथील धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदानी केलेल्या भाषणांनी त्या प्रभावित होवून हिंदू धर्म व संस्कृतीकडे आकर्षित झाल्या. आपल्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी भारतीय जनतेत हिंदू संस्कृतीविषयीचा स्वाभिमान जागृत ठेवण्याचे कार्य केले. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून भारतीय जनतेला राजकीय क्षेत्रात स्वशासन मिळवून देण्यासाठी त्यांनी होमरूल चळवळ सुरू केली. आपल्या कॉमनवील या साप्ताहिक व न्यू इंडिया या वृत्तपत्राद्वारे ब्रिटिश सरकार भारतीय जनतेवर करत असलेल्या अन्याय अत्याचाराविरूध्द त्यांनी आवाज उठविला. स्वराज्याचे हक्क हे चळवळ उभारून व राज्यकर्त्यांशी झगडूनच मिळविले पाहिजेत यांचा आदर्श डॉ. ॲनी बेझंट यांनी भारतीय जनतेला घालून दिला. एक परदेशी व्यक्ती भारतीय स्वातंत्र्याबद्दल एवढी कियाशील असू शकते याचा आदर्श म्हणजेच डॉ. ॲनी बेझंट होय. अशा या थोर विदुशीचे थिऑसॉफिकल सोसायटीचे केंद्र असणाऱ्या मद्रासमधील अड्यार येथे 20 सप्टेंबर 1933 रोजी निधन झाले. त्यांच्या विषयी आदरभाव वाटत होता म्हणूनच भारतीयांनी त्यांच्या अस्थी गंगेमध्ये विसर्जित करून आदरांजली वाहिली.

**संदर्भ :**

1. डॉ. कोठारे अनिल– भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, आवृत्ती–जून 2013, पृ.क.340
2. नवाझ ब. मोदी (संपा.)– भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुनर्मुद्रण– मे 208, पृ.क. 339
3. डॉ. गव्हाणे, डॉ. शिंदे, डॉ. कुलकर्णी (देशमुख) – भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती– जून 2015, पृ.क. 114
4. तारा धर्माधिकारी– स्वातंत्र्य लढ्यातील स्त्री, ऑगस्ट कांती महोत्सव समिती, शासकीय अस्थायी कुटीर क. 4, मुंबई, प्रथमावृत्ती– ऑगस्ट 1992, पृ.क. 27
5. बेस्टरमन, थिओडोर, मिसेस ॲनी बेझंट–अ मॉडर्न प्रोफेट, केगन पॉल, लंडन, सन–1934, पृ.क. 192
6. डॉ. गव्हाणे, डॉ. शिंदे, डॉ. कुलकर्णी (देशमुख) – पुर्वोक्त, पृ.क. 116
7. जॉर्ज अरूंडेल यांच्या टीपासंह– बेझंट ॲनी,ॲन ऑटोबायोग्राफी, अड्यार आवृत्ती, मद्रास, सन 1939, पृ.क. 27
8. डॉ. श्रीनिवास सातभाई– आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, चतुर्थ आवृत्ती– जानेवारी 2016 पृ.क. –313
9. तारा धर्माधिकारी– पुर्वोक्त, पृ.क. 27
10. गायकवाड, थोरात, पाटील, भिडे– भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती– ऑगस्ट 1988, पृ.क. 154
11. डॉ. बी. एन. सरदेसाई, डॉ. व्ही.एन. नलावडे– आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती– नोव्हेंबर 2004

S.P.Mahavidyalaya Bhoom
BHOOM
Ta.Bhoom Dist.O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad